**प्रेस नोट** **दिनांक १३/०४/२०१९**

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर

### पोलीसांनी केले मार्गदर्शनाने प्रभावित होऊन सोसायटी सभासदांनी मानले आभार

वारजे माळवाडी पोलीस ठाणे हद्दीतील सप्तपदी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित स.नं. १३४, वारजे माळवाडी, ता. हवेली जि. पुणे च्या पदाधिका-यांनी वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे येऊन सोसायटी सभासदांना सुरक्षा विषयक मार्गदर्शन करणेबाबत विनंती केली होती.

दिनांक ११/०४/१९ रोजी सांयकाळी १९.०० वा वारजे माळवाडी पोलीस ठाण्याकडील पो.उप-निरीक्षक श्री. सचिन निकम, म.पो.उप-निरी. श्रीमती प्रियांका गायकवाड, पो.शि. कुंडलिक झुंबड, सद्दाम तांबोळी यांनी सप्तपदी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित स.नं. १३४, वारजे माळवाडी, ता. हवेली जि. पुणे येथे जाऊन सोसायटी सभासदांना त्यांचा फ्लॅट भाडयाने दिल्या नंतर भाडेकरूची माहिती पोलीस ठाण्यास देऊन त्याची एक प्रत सोसायटी कडे देणे कसे सुरक्षित असते, त्यामुळे कोणकोणत्या गुन्हयांना आळा बसू शकतो, भाडेकरूची माहिती न दिल्याने फ्लॅट मालक कश्या प्रकारे अडचणीत येऊ शकतो, भाडेकरूची माहिती न दिल्याने भाडेकरू देश विघातक काम कश्याप्रकारे करतो याबाबत बहुमोल माहिती घडलेल्या घटनांचे संदर्भ देऊन दिली.

तसेच महिला पो.उप-निरी. श्रीमती गायकवाड यांनी सासूरवास, सुनेचा छळ, रस्त्याने जाणा-या स्त्रियांच्या दागिन्यांची चोरी, अपरिचित माणसाकडून फसवणूक, ओळखीच्या माणसाकडून विनयभंग व बलात्कार, सायबर गुन्हे यापासून कसे दक्ष रहावे याबाबत र्मादर्शन केले.

वर नमूद पोलीस अधिकारी व कर्मचा-यांनी केले मार्गदर्शनाने सोसायटी सभासदांनी प्रभावित होऊन सोसायटी तर्फे वर नमूद पोलीसांचे आभर मानन्यासाठी आभार पत्र पोलीस ठाण्यास सादर केले आहे.